RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ८, अंक १९] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर १-७, २०२२/ भाद्रपद १०-१६, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट २०२२

### अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक सीआरसी २०२२/प्र.क्र. २३/का. बारा.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या नागपूर जिल्ह्यातील सावनेर आणि कळमेश्वर तालुक्यांशी संबंधित आहेत तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक ११ सप्टेंबर २०२२ पासून, त्याच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये उक्त अधिनियमातील निर्णय करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत अधिकारिता असलेल्या प्रमाणे, नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे सहसचिव व विधि सल्लागार.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 25th August 2022.

*NOTIFICATION*

HINDU MARRIAGE ACT, 1955.

No. CRC 2022/CR 23/Desk XII.— In exercise of the powers conferred by clause (b) of Section 3 of the Hindu Marriage Act, 1955 (25 of 1955), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf ; and in partial modification of all earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Saoner and Kalmehswar tehsils of Nagpur District, the Government of Maharashtra hereby, with effect from 11th September 2022, specifies the Court of Civil Judge (Senior Division) at Saoner in Nagpur District, as having jurisdiction in respect of the matters dealt with in the said Act within the local limits of its ordinary jurisdiction.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Joint Secretary to Government.

## विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट २०२२

### अधिसूचना

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक सीआरसी २०२२/प्र.क्र. २३/का. बारा.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याचे कलम २१, २२अ व २३ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा जेथवर त्या जिल्हा न्यायालय, नागपूर यांना दुय्यम असणाऱ्या दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, नागपूर यांच्याशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देत आहे की, दिनांक ११ सप्टेंबर २०२२ पासून,—

(क) नागपूर जिल्ह्यामध्ये सावनेर येथे जिल्हा न्यायालय, नागपूर यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय असेल ;

(ख) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), हे, उक्त न्यायालयाच्या अध्यक्षस्थानी असतील आणि ते सावनेर येथे आपले न्यायालय भरवतील ;

(ग) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) सावनेर यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये नागपूर जिल्ह्यातील सावनेर आणि कळमेश्वर महसुली तहसिलाच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांचा समावेश असेल आणि जी क्षेत्रे यापूर्वी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) नागपूर यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट होती ती उक्त क्षेत्रे त्यामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे सहसचिव व विधि सल्लागार.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 25th August 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. CRC 2022/CR 23/Desk XII.— In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act, (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf ; in partial modification of all earlier notifications issued in this behalf ; in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Nagpur, sub-ordinate to the District Court, Nagpur, the Government of Maharashtra hereby, directs with effect form 11th September 2022 :—

*(a)* there shall be a Civil Court at Saoner sub-ordinate to the District Court, Nagpur in Nagpur District ;

*(b)* the said Court shall be presided over by the Civil Judge, Senior Division, who shall hold his Court at Saoner ; and

*(c)* the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Saoner, shall comprise the areas covered within the local limits of the revenue Talukas of Saoner and Kalmehswar in Nagpur District and the said areas which were heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Nagpur shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.